साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५
020-25538041 ते 44, Ext.no.317 commsugarvikas@gmail.com

जा.क्र.साआ/विकास/कक्ष-११/मानव-वन्यजीव संघर्ष उपपाययोजना/५६७/२०२५ दि.१० /१०/२०२५

प्रति,

१.कार्यकारी संचालक, सहकारी साखर कारखाने (सर्व)

२.जनरल मॅनेजर, खाजगी साखर कारखाने (सर्व)

विषय : ऊसाचे क्षेत्रामध्ये वाढत असलेल्या मानव-वन्यजीव (बिबट) संघर्षावर उपाययोजना करणे बाबत..

संदर्भ : १) मा.उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर यांचे दि.११/११/२०२४ रोजीचे पत्र
२) मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचे दि. १३/१२/२०२४ रोजीचे पत्र
३) साखर आयुक्तालयाचे पत्र क्र.५४१, दि.२७/१२/२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणामध्ये धरणे आणि सिंचनाची सोय झाल्यामुळे कोरडवाहू क्षेत्रात देखील ऊसा सारख्या नगदी पिकाची लागवड केली जात आहे. ऊस लावून २-३ महिन्यानंतर माणसाचा वावर नसतो पण तेथे पाण्याची उपलब्धता असते. या कारणास्तव बिबटयाकरिता हे नैसर्गिक क्षेत्र नसूनही ऊस लागवडीच्या क्षेत्रात बिबट्यांच्या अधिवासासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. ऊस लागवडीचा हंगाम संपल्यानंतर बिबट्यांचा वावर असतो, तसेच ऊस तोडणी झाल्यावर बिबट्याची कमी वयाची पिल्लं सापडतात ज्या कारणास्तव मानव - वन्यजीव संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. ऊस पीक हे बिबट्यांना लपण्यासाठी सुरक्षित ठिकाण झाले असून त्यामध्ये असणारे मुबलक नैसर्गिक भक्ष्य (ससे, रानडुक्कर, इ.) यांमुळे वन्यप्राणी बिबट यांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

२. दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यापासून ऊसतोडणी हंगामाकरिता विविध ऊस कारखान्यांकडे महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमधून हंगामी मजूर मोठ्या प्रमाणात दाखल होत असतात. सदर मजूर हे संबंधित ऊस कारखान्याच्या परिसरात तसेच ज्या ठिकाणी ऊसतोड करावयाची आहे, अशा क्षेत्रानजीक मोकळ्या जागेवर तात्पुरत्या झोपड्या तयार करुन त्यामध्ये वास्तव्यास असल्याचे दिसून येते. यास्तव सदर ठिकाण हे बिबट वन्यप्राण्याकडून भक्ष्य समजून मानवावर होणाऱ्या हल्ल्यांसाठी अतिसंवेदनशील होते. यातून मानव-बिबट ची तीव्र संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊन ऊसतोडणीसाठी आलेल्या कामगारांकरिता असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण होते. या कारणास्तव ऊस तोडीच्या हंगामात सर्व क्षेत्रिय कार्यालयांना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी सूचना दयावी.

३. असे दिसून आले आहे की, जास्त करून पश्चिम महाराष्ट्रात ऊसतोड कामगार हे मराठवाडा इत्यादी भागातून आणले जातात आणि ते ऊसाच्या क्षेत्रात पाल टाकून वास्तव्यास असतात. अशा वेळी त्यांना पाल किंवा टाकलेले घर / झोपड्या तात्पुरत्या स्वरूपात असतात व सोबतच पती-पत्नी कामावर गेल्यावर त्यांचे अल्पवयीन मुले बाहेर उघडयावर वावरत असतात.

बिबट्या शिकारी योग्य भक्ष्याची ओळख आणि त्यांचे आकलन भक्ष्याच्या उंचीवरुन करतो. भक्ष्याची उंची बिबट्याच्या डोळ्यापेक्षा कमी असल्यास असा भक्ष्य बिबटयास शिकारीसाठी अनुकूल वाटतो. अशा वेळी जी लहान मुले आई-वडिलांचे संरक्षणाखाली नसतात ते बिबटयाला त्याची शिकार असल्यासारख वाटतात. या

कारणास्तव ऊस तोडीच्या हंगामात सर्व साखर कारखान्यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१. ऊस तोडीचा हंगाम सुरु होण्यापूर्वी संबंधित साखर कारखान्यांचे व्यवस्थापनाकडून या बाबींची माहीती संबंधित वनविभागाच्या मदतीने देवून व्यवस्थापनामार्फत ऊसतोडीच्या मजूरांमध्ये या संभाव्य धोक्याबाबत अवगत करणे, शक्यतो उस तोडणीसाठी येणा-या या मजूरांची व्यवस्था शेती ऐवजी दुस-या ठिकाणी करण्याचा प्रयत्न करावा.

२. जर कांही कारणास्तव मजूरांना शेतातच ठेवण्यात येत असेल तर,
अ) मजूरांचे वास्तव्याचे ठिकाणी चार ही बाजूला अस्थाई /तात्पुरते कुंपन करण्यात यावे.
ब) मजूरांच्या वास्तव्याच्या ठिकाणी विद्युत प्रकाशाच्या सोईची व्यवस्था करावी.
क) ज्यावेळी आई-वडील कामावर जात असतील अशा वेळी मजूरांच्या पाल्यांची देखभालीसाठी विशिष्ठ व्यक्ती नेमून त्यांची देखरेख आणि संगोपन आणि शिक्षण इ. ची व्यवस्था करावी.
४. वनविभागामार्फत मानव-बिबट संघर्षाकरिता संवेदनशील सर्वच क्षेत्रामध्ये वेळोवळी गस्त करणे तसेच संघर्ष कमी करण्याहेतू मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येते. यास्तव खालील दक्षतापर सूचनांबाबत ऊसतोड कामगारांमध्ये जन जागृती करावी.

**वन्यप्राणी बिबट करिता अतिसंवेदशील भागांमध्ये नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी :**

१. शेतात काम करताना एकटयाने न जाता समुहाने तसेच आवाज करत सावधानता पुर्वक कामे करावीत.
२. लहान मुलांना / वृध्दांना घराच्या बाहेर एकटे सोडू नये तसेच घराबाहेर उघड्यावर झोपू नये.
३.ऊसतोड कामगार यांचे वास्तव्याच्या सभोवती सौरऊर्जा कुंपण करुन घ्यावे.
४. वस्तीच्या बाजूचे गवत व झुडुपे काढून परिसर स्वच्छ ठेवावा.
५.दिवस उगवण्यापूर्वी व दिवस मावळल्यानंतर शक्यतो घराबाहेर पडू नये, अपरिहार्य असल्यास सोबत टॉर्च व मोठी काठी बाळगावी.
६. वस्तीजवळ रात्रीच्या वेळी मोठे प्रकाशदिवे लावावेत.
७. नागरिकांनी उघड्यावर शौचास बसू नये, शौचालयाचा वापर करावा.

विषयांकित प्रकरणी कारखान्याचे व्यवस्थापनाने वनविभागाचे संबंधीत कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने ऊसतोड कामगारांमध्ये जनजागृती करावी जेणेकरून मनुष्य हानी निश्चीतच टाळणे शक्य होईल.

Digitally signed by
SANJAY GENDRAJ KOLTE
Date: 10-10-2025
13:28:38
(डॉ.संजय कोलते)
साखर आयुक्त

प्रत- कार्यवाहीसाठी
१.प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)
२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या., मुंबई- २१
३.कार्यकारी संचालक, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन, पुणे

प्रत - माहितीस्तव
१) मा.उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर
२) मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे